**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : १५/०३/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र. ०८ सोमवार दि. १९/०३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता** अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक - १९/०३/२०१८ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०८**

विषय क्रमांक -७६ सोमवार दिनांक १९/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर महानगरपालिका जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक/९११/१८दि. १५/०३/२०१८

**विषय :-**सन २०१७-२०१८चे सुधारित व सन२०१८-२०१९चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक १९/०३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी, ही विनंती.

येणे प्रमाणे मा. आयुक्त साहेब यांचे पत्र

मा.सभापती स्थायी समिती यांचा अभिप्राय की,प्र.नगरसचिव दि.१९/३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. अंदाजपत्रकीय सभा बोलावणे बाबत उचित कार्यवाही करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

मा.स्थायी समिती सभा सोमवार दि.१९/३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा. आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समिती सभापती साहेब यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवून स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

मा.सभापती साहेबः- अहमदनगर शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता आवश्यक असणा-या मनपाच्या अर्थसंकल्पा करीता आजची मिटींग आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वात प्रथम मी मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी,पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे समितीच्या वतीने हार्दिक स्वागत करते. अंदाजपत्रकाचे वाचन चालू करा.विषयाचे वाचन करण्यात आले.मा.आयुक्त अंदाजपत्रक सादर करतील.

मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रक मा.सभापती यांचेकडे सादर केले.

मा.सभापती साहेब :- २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी या ठिकाणी सादर केले आहे. सर्व स्थायी समिती सदस्य , पदाधिकारी , सर्व अधिकारी , सन्माननीय सदस्य, अर्थ संकल्पाची मिटींग करता उपस्थित सर्व पत्रकार, कर्मचारी यांचे या ठिकाणी स्वागत करते. यानंतर मा.आयुक्त सो.यांनी मनोगत व्यक्त करावे अशी विनंती करते.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- मा.आयुक्त साहेब,बजेट सादर करण्यास उशीर का झाला?आज बजेट सादर केल्यानंतर सदस्यांना बजेटवर आभ्यास करण्यास वेळ कमी मिळणार आहे.

मा.आयुक्त श्री. घनश्याम मंगळे साहेब :- गेल्या काही दिवसांपासून पथदिवा घोटाळा प्रकरणी कार्यालयातील बरेचसे अधिकारी कार्यालयाता उपस्थित नव्हते.अर्थसंकल्पातील प्रमुख मुख्यलेखाधिकारी व उपायुक्त

(कर) हे अनुपस्थीत असल्याने अर्थसंकल्प मांडण्यास विलंब झाला आहे.पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली होती दरम्यानच्या काळात मुख्यलेखाधिकारी उपस्थित झाल्याने आत बजेट सादर केले आहे.३१ मार्च च्या आत बजेट पुर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू.

**मा.आयुक्त श्री. घनश्याम मंगळे साहेब यांनी अर्थसंकल्पावरील दिलेली माहिती :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे ६१९ कोटीचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.यामध्ये अंदाजपत्रकात उत्पन्न रू.३१५.४६ कोटी,भांडवली जमा रू.२६३.७९ कोटी धरणेत आले आहे.महसूली उत्पन्नात संकलीत करापोटी रू.५५ कोटी,शास्ती पोटी रू.४८ कोटी,जी.एस.टी.अनुदान ८५ कोटी व इतर महसुली अनुदान रू.१० कोटी,गाळा भाडे २ कोटी, पाणीपट्टी,पाणी विक्री,मिटरव्दारे पाणी पुरवठा इ.पोटी ७१ कोटी ९७ लाख ,संकीर्ण ५ कोटी ६१ लाख इ.महत्वाच्या बाबींसह महसुली खर्च २२६ कोटी ५५ लाख धरण्यात आला आहे.तसेच भांडवली कामांवर अनुदान,कर्ज व मनपा हिस्सा धरून रू.३५३ कोटी १० लाख अंदाजित खर्च होणार आहे.

मा.श्री.संजय शेंडगे:-मा.सभापतीसाहेब आज सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याकरिता एक दिवसाचा वेळ देण्यात यावी.मंगळवार दि.२०/०३/२०१८रोजी सकाळी ११.३० वा.सभा सुरू करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपलिकेचे सन-२०१८-१९ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब यांनी सादर केले आहे.अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर मा.श्री.संजय शेंडगे व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे चर्चा करण्यासाठी मंगळवार दि.२०/३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. सभा पुढे सुरू होईल.सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी सभे करीता आवश्यक त्या माहितीसह सभेस उपस्थित रहावे.

**दिनांक १९/३/२०१८रोजी तहकुब झालेली सभा आज दिनांक २०/३/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा सुरू करण्यात आली.**

मा.सभापती साहेब :- काल दिनांक १९/३/२०१८ रोजी तहकुब केलेली सभा आज दि.२०/३/२०१८ रोजी सुरू करण्यात येत आहे.काल दिलेल्या सुचने नुसार सर्व विभाग प्रमुख हजर आहेत का ? प्रत्येक लेखार्शिर्षा नुसार चर्चा सुरू असतांना प्रत्येक विभाग प्रमुखांनी आपल्या विषयाची माहिती दयावी.लेखार्शिर्षा नुसार वाचन सुरू करण्यात यावे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- काल वालगुडे साहेब बैठकीस उपस्थित नव्हते,आपण खुलासा करा.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री. वालगुडे :- वसुलीसाठी मा.आयुक्त साहेब यांनी आदेश काढले त्या नुसार दिनांक ११/३/२०१८ पासुन झेंडीगेट झोन मध्ये वसुलीचे कामा साठी उपस्थित होतो.तेथुन येई पर्यत बजेटची मिटींग तहकुब झाली होती.मा.आयुक्तांना प्रत्येक वेळी इथे चाललो,तेथे चाललो हे सांगायची गरज नाही.त्यांच्या आदेशानुसारच काम करीत आहे.झेंडीगेट झोनला ५६ वॉर्ड आहेत.तेथे फक्त दोन लिपीक कार्यरत आहेत.बजेटची मिटींग उपायुक्त (सा) पहातात.ते उपस्थीत नसतीतल तर त्यांच्यावर कारवाई करा.मुंबईच्या अमृतच्या मिटींगला उपस्थित रहायचे,अनुसुचीत जाती आयोगाचे सुनावणीस उपस्थित रहावे लागते.मिटींगला सांगूनही अधिकारी उपस्थित राहत नाही. त्यांच्यावर कारवाई करा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- बैठकीला असणे आवश्यक आहे.आपण उपस्थित नाहीत या बाबत माहिती दया.

मा.सभापती साहेब :- येथे उपस्थित असलेल्या प्रत्येक अधिका-याने आपली ओळख करून दयावी.म्हणजे कोण उपस्थित नाही हे समजेल.

उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांचा कार्यरत विभाग व नांव सांगून माहिती सभागृहात दिली.

मा.प्र.उपायुक्त श्री.तडवी :- सर्व अधिकारी उपस्थित असल्याचे दिसुन येते,श्री.गोसावी प्रभाग अधिकारी व श्री.साबळे हे निवडणूकीच्या कामासाठी असल्याने येथे उपस्थित नाही.

मा.सभापती साहेब :- प्रत्येक लेखाशिर्षानिहाय वाचन सुरू करण्यात यावे.प्रत्येक लेखाशिर्षाची माहिती दयावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- सन २०१८-१९ चा अर्थसंकल्पामध्ये आपण महसुल उत्पन्न, भांडवली उत्पन्न,एकुण जमा यांचे लेखाशिर्षका प्रमाणे वाचन करण्यात येत आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- आपण नविन उत्पन्न मार्ग शोधले पाहिजे बिगरशेती करतांना आपण टॅक्स लावला पाहिजे.

रिव्हिजन विभाग श्री.झिने :- आपण १ टक्का खरेदी खतावर घेतो. शासन निर्णय झालेला आहे.एन.ए.करतांना टॅक्स वसूली करीता आपण त्यांचेकडे पत्रव्यवहार करून रेकॉर्ड मागणी केली पण ते आपल्याला रेकॉर्ड देत नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- रेकॉर्ड आपल्याकडेच असते आपणच प्लॉट पाडून ले आउट तयार करून देतो.

नगररचना विभाग श्री.जोशी :- नगररचना विभागामध्ये प्लॉट आपण पाडतो.

रिव्हिजन विभाग श्री.झिने :- बांधकाम परवान्याची प्रत घेवून बाकीचे टॅक्स त्यांना जमा करावा लागतो.

मा.आयुक्त साहेब :- जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल विभागाची व महानगरपालिकेची संयुक्त बैठक बोलविण्यात यावी.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- या करीता नविन लेखाशिर्ष तयार करून रू.५० लाखांची तरतुद करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- वसुली विभाग पान नं.३ सर्वसाधारण कराचे वाचन केले.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- ज्या विभागात माणसं कमी आहेत तीथे कर्मचारी देण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये अपेक्षीत उत्पन्नाची आकडेवारीत रू.१ कोटी ने वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- महानगरपालिकेच्या मालकीचे ८४० गाळे आहेत.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- थकीत भाडे ३.५ कोटी आहे. आज अखेर रू.७५ लाख वसुल झालेले आहेत.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री. वालगुडे :- पुस्तकामध्ये टक्केवारी कमी असल्याचे दिसुन येते

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- पुस्तकात नोव्हेंबर पर्यत आकडे वारी आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- वसुली लिपीक व मार्केट विभाग यांनी योग्य नियोजन केले नसल्याने वसुलीवर परिणाम झालेला आहे.आपण योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजे.

मा.आयुक्त साहेब :- आपण प्रभाग वाईज अधिका-यांची नेमणूक करून जास्तीत जास्त वसुली बाबत उपाययोजना केल्या आहेत.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- आपण केलेली भाडेवाढ गाळेधारकांना मान्य नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- उत्पन्न वाढीचे कोणी पहात नाही.फक्त कागदावर घेतले जाते.महालक्ष्मी उदयान खाजगीकरणातुन चालविण्यास दया.कोठेही काम व्यवस्थीत होत नाही.७० ते ८० % कर्मचारी काम करीत नाही.जनता आम्हाला विचारते, सावेडी भागात सर्वात जास्त टॅक्स जमा होतो.त्यांना सुविधा मिळत नाही.

मा.आयुक्त साहेब :- या बाबतीत प्रशासनाकडून प्रयत्न झाले माझ्याकडे या बाबत बैठका झाल्या,क्षेत्राप्रमाणे आकारणी करा अशी त्यांची मागणी होती.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- महासभेच्या ठरावानुसार रेडीरेकनर नुसार केलेली भाडे वाढ त्यांना मान्य नाही.नगररचना विभागाने प्रत्यक्ष जागेवर जावून मोजणी करून भाडे आकारणी करून रक्कम भरावी.किमान ६० टक्के रक्कम भरावी असे बैठकीत ठरले.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- गाळे धारक व नगररचना विभाग प्रमुख यांची संयुक्त बैठक बोलविण्यात येवून यावर तोडगा काढण्यात यावा.

मा.सभापती साहेबः- गाळे भाडयापोटी मिळणा-या अपेक्षीत उत्पन्नामध्ये रू.२०लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.श्री.संजय शेंडगेः-बजेटची मिटींग चालू आहे वालगुडे सो. हे बैठकीतुन निघुन गेले त्यांच्यावर कारवाई करा.

मा.आयुक्त साहेब :- तुम्ही आदेश दया.मी कारवाई करतो.

मा.श्री.बाबासाहेब वाकळेः- अनेक कर्मचा-यांच्या बदल्या होतात परंतु ते हजर होत नाहीत.

मा.प्र.उपायुक्त श्री. तडवी :- बदली आस्थापना विभागामार्फत झाल्यास संबंधीत विभाग प्रमुख अनुभवी कर्मचारी असेल तर त्याला बदली जागेवर सोडत नाहीत.व बदली रद्द करणे बाबतचे प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे कडे सादर करतात.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- बदली जागेवर कर्मचा-याला हजर व्हावे लागेल नाहीतर मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशाचे अवमान्यता होते.

मा.सौ.अनिता राठोड :- सिध्दीबागेमध्ये मोठया प्रमाणात कचरा, घाण असल्याबाबत माझ्याकडे मोठया प्रमाणात नागरीकांच्या तक्रारी आल्या आहेत.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- मला नागरिक सिध्दीबागेत घेवून गेले, ठिकठिकाणी कचरा साठलेला होता. तो कचरा डोळयाने पाहीला. तेथील कर्मचा-यांना श्री. गोयल यांनी इतर ठिक्ाणी पाठविले होते. मी मा. महापौर यांना माहिती दिली. या बागेमध्ये भेळीच्या गाडीवाले साफसफाई करतात याचा माझेकडे पुरावे आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :-गार्डनचे अतिरीक्त कर्मचारी आहेत त्यांना वसुली किंवा ज्या विभागामध्ये कामाची आवश्यकता आहे आशा ठिकाणी बदली करा.

अति.आयुक्त श्री. वालगुडे :- गार्डनचे म्हसे येथे उपस्थित नाहीत.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- मनपा कर्मचा-यांबाबत आयुक्त साहेब तुम्हाला जबाबदारी स्विकाराली लागेल.

मा.आयुक्त साहेब :- म्हसेंच्या निलंबनाची फाईल तात्काळ आस्थापना विभागामार्फत सादर करा.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- वसुली चांगली करा

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- बांधकाम खात्याकडे पूर्वी २५ ते ३० कर्मचारी होते. आता फक्त ४ कर्मचारी आहेत त्यांना कर्मचारी वाढवून दया.

शाखा अभियंता श्री. सोनटक्के :- याबाबत निश्चित माहिती नाही. साईटवर काम करायला ७-८ कर्मचारी आहेत. कर्मचारी कमी पडतात. सेवानिवृत्त किंवा मयत झाल्याने व नविन नियुक्ती नसल्याने कर्मचा-यांची संख्या कमी आहे.

मा.योगीराज गाडे , मा. विक्रम राठोड नगरसेवक व इतर यांनी मा. आयुक्त साहेब यांना सभागृहात निवदेन सादर केले.

मा.सभापती साहेब :- स्थानिक संस्था करामध्ये कर या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२५ लाखांची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- किंगरला बोलावा मस्टरवर किती लोक आहेत.

मा.सभापती साहेब :-सभागृहाची शिस्त पाळा दरवाजाची कडी उघडू नका ,लेखा शिर्षाचे वाचन करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अपेक्षीत उत्पन्न ५५ कोटी धरले आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- प्रत्यक्षात जमा किती विभागाने माहिती दयावी.

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- सर्वसाधारण कर एकुण मागणी रू.५६ कोटी ३४ लाख येणे आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- आपल्याकडे एवढे पैसे येणार नसेल तर बजेट का फुगवीलेले आहे.

मा.आयुक्त साहेब :- एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ अखेर डिमांड धरली आहे गेल्या वर्षी एकुण डिमांड किती २०१८-२०१९ मध्ये रू.५६ कोटी डिमांड आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- त्या पध्दतीने आपण खर्च टाकला.

मा.आयुक्त साहेब :- डिमांड पुर्ण वसुल करणे आपले काम आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- मागील तीन वर्षाचे जे उत्पन्न मिळालेते गृहीत धरून खर्च करावा.

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- गेल्या वर्षात रू.१६ कोटी वसुली आली त्यामध्ये रू.१५ कोटी २० लाख संकलीत कर वसुल झाला.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- खर्च टाकल्यामुळे बजेट कोलमडतो.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- आपण ज्या एजन्सी व्दारे मालमत्ता सर्व्हे करीता नेमले त्यांनी ब-याच प्रापर्टी सोडल्या अशी माहिती आहे.

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- प्रत्येक प्रभाग अधिकारी व वसुली क्लार्क यांची जबाबदारीआहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- जे कर्मचारी काम करीता नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करावी.

मा.आयुक्त साहेब :- प्रत्येक विभागासाठी टार्गेट दिले आहे. वसुली करणे करीता कारवाई करावी लागेल. कशा मुळे वसुली होते किंवा नाही हे पहावे लागेल. याचा आढावा घेवून जे अधिकारी व कर्मचारी वसुली कारणार नाही त्यांच्यावर कारवाई प्रस्तावीत करावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- वृक्ष कर रू.१ कोटी दाखविला आहे. आत्तापर्यत रू.२० लाख वसुल झाला आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- विशेष स्वच्छता कर रू.५५ लाख आहे. जाहिरात कर रू.१६ लाख आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- जाहिरात करात वाढ करला येईल का ? या विभागाचे काम कोण पहातात.

श्री.आंबादास सोनवणे :- जाहिरात कराचे काम श्री. देशमुख पाहतात सध्या ते निवडणूक कामच्या डयुटीवर आहेत.

मा.सभापती साहेब :-शहराच्या भौगोलीक रचनेचा विचार करता सध्याच्या डिजीटल युगात जाहिरातीवर व्यावसायीकांचा जास्त प्रमाणात भर असतो.त्यामुळे या लेखाशिर्षातर्गत रक्कम रूपये १०लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- श्री.साठे झेंडीगेट विभाग आहेत का ?

झेंडीगेट विभाग श्री. साठे :- झेंडीगेट विभागा मध्ये १२ वॉर्ड पैकी ८ वॉर्ड रिक्त आहेत.या वॉर्ड करीता वसुली कर्मचारी नाहीत. प्रभाग अधिकरी नाही. ४ दिवसापासून २ हजर झाले आहेत.श्री.साबळे यांच्या कडे निवडणूकीचे काम देण्यात आले आहे.

मा.आयुक्त साहेब :- निवडणुकीचे काम सांभाळून त्यांना सहयाचे अधिकार दिले जातील. निवडणूकी नंतर ते पुन्हा कामावर येतील.कर्मचा-यांचा आढावा घेवून जेथे कमी कर्मचारी आहेत तेथे कर्मचारी दिले जातील.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-रस्ता कर रूपये २ कोटी ७५ लाख , मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई रूपये २ कोटी ८० लाखा उत्पन्न धरण्यात आले आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईतुन किती प्रत्यक्षात जमा झाले.

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- दंडात्मक वसुली टी.पी.चा विषय आहे

मा.सभापती साहेब :- मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- घनकचरा व्यवस्थापन रू. ८ कोटी ५७लाख असे आहे. एकुण वसुलीचे रू.७१ कोटी ३७ लाख अपेक्षीत आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- जास्तीत जास्त वसुल करण्याचा प्रयत्न करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अग्निशमन विभाग आग विझवणे रू. १ लाख फी

अग्निशमन प्रमुख श्री.मिसाळ :-मनपा च्या हद्दीच्या बाहेर आग विझवण्यासाठी आपण चार्जेस घेतो.ग्रामीण भागात गाडी पाठवल्यास त्यांचेकडून वसुली करण्यात येते. आग विझवणे दाखल फी त्याचे पैसे आकारतो ना हरकत प्रमाणपत्रासाठी ५०० ते १००० केली , स्टॅण्ड बाय डयुटी साठी रू.१ लाख ७५ हजार आग विझवणे म्हणून रू. ८ लाख तरतुद केली आहे. इतर वसुली रू.३० हजार फी घेते.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- इतर मध्ये १% मुद्रका शुल्कापासून रू. ७ कोटी, यावर्षी रू.७ कोटी १० लाख

मा.आयुक्त साहेब :- सन २०१६-२०१७ मध्ये जमा झालेले नाही

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- त्यांच्याकडे सुरूवाती पासून ची रक्कम शिल्लक किती असेल.

एल.बी.टी विभाग प्रमुख श्री. गांधी :- मा.शासन ३ महिन्याला किंवा वर्षाला रक्कम देतात. यावर्षी एकदम रू.७ कोटी ३० लाख जमा केले आहेत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- पाठपुरावा वेळेवर करा.वसुली झाली पाहिजे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- कोंडवाडा रू. ५० हजार फी

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- कोंडवाडा चालू आहे का ?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- कर्मचारी इतर विभागात आहे ते मिळले तर वडगाव जवळील कोंडवाडा जनावरे वाढवला येतील. आता सध्या फक्त एक कर्मचारी आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- मुंबई नर्सिग होम ॲक्ट अंतर्गत फि नियमीत वसूल होते का ? किती डॉक्टरांनी ओ.पी.डी.ची परमिशन घेवून प्रत्यक्षात हॉस्पीटल चालू केले आहे. अशा डॉक्टरांची संख्या किती आहे.अनेक हॉस्पीटल मध्ये पार्किग साठी जागा सोडलेली नाही. अनाधिकृत बांधकाम केलेली हॉस्पीटल ची संख्या किती आहे ?

मा.सभापती साहेब :- नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये रू.८ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- सध्या तो कर्मचारी कुत्र्यांना अन्न टाकणे, साफ सफाईचे काम करतो.

नगररचनाकार विभाग श्री. जोशी :- मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा मधील आकडा विभागामार्फत दिलेला नाही.शहरामध्ये २३४ टॉवर नाहीत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- मोबाईल टॉवरची कोण वसुली करते ते सांगा

रिव्हिजन विभाग श्री. झिने :-दंडात्मक ची तरतुद आम्ही दिलेली नाही. बांधकाम परवानगी देण्यात येते. ज्या वेळी देतात त्यावेळी वसूल होवू शकेल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- तुमचा विषय आहे,तुम्हाला तोंडपाठ असला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- आयुक्त साहेब विभाग प्रमुखांना विषयाची माहिती नाही.

नगररचनाकार विभाग श्री.जोशी :- दंड दोन प्रकारचा असतो.शहरामध्ये २३४ टॉवर आहेत.

मा.सभापती साहेब :- खाते प्रमुख यांना माहिती नसते.एका टॉवरवर किती संख्या आहे.नियमावली काय आहे. मोबाईल टॉवरचे वसुलीसाठी नेमकी किती रक्कम आहे.किती पैसे वसुल केले हे पाहण्याचे काम कोणाचे आहे.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- एजन्सीची गरज आहे का?आपले कर्मचारी लायक नाही का?आपले लोक चांगले काम करू शकतात.

मा.आयुक्त साहेब :- मोबाईल कंपनीची मिटींग घेण्यात येईल.काम समाधानकारक नसेल तर फेरविचार करावा लागेल.

नगररचना विभाग श्री.जोशी :-२३४ टॉवर सर्व्हेक्षण केले २ मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आली.विनापरवाना टॉवर व प्रस्ताव दुप्पट ,तिप्पट दराने वसुली करणे बाबत कळविले आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- मनपा परिसरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारण्या करीता स्वतंत्र्य हेड तयार करा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- लगेच वसुली करा ,पाठपुरवा करा. भरपूर उत्पन्न मिळेल.

मा.आयुक्त साहेब :- डि.एम.सी.ना आत्ताच चार्ज दिला त्यामुळे हे काम मागे पडले.अति.आयुक्त यांनी वसुली साठी काय प्रयत्न केले हे सांगावे.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- बुरुडगांव सावेडीच्या बरोबरीने वसुली केली. हायस्ट वसुली केली.

श्री.गोडळकर :- वसुली चांगली केली. आकडेवारी आणली नाही, १० जप्ती वॉरंट काढले त्यांचे जवळजवळ २२ लाख वसुल केले आहेत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- आकडे मागवून घ्या.

प्रभाग अधिकारी :- ३४ कोटी पैकी १६.५० कोटी वसुल जवळ जवळ ४८ % वसुली आहे. कर्मचारी ३५ होते त्यापैकी ४ झेंडीगेटला सावेडी मागणी पैकी १६ कोटी ५० लाख होते. यावेळी १६.५० कोटी वसुली केली सर्वांना वसुलीचे तगादे करायला सांगीतले आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मंगलकार्यालय,गाळे हस्तांतरण फी १ कोटी तरतुद करण्यात आली आहे,मार्केट स्लॉटर ३५ लाख रुपये ,शास्ती नोटीस फी ४८ कोटी.दाखविण्यात आली आहे.

मा.सभापती साहेब:- गाळे हस्तांतरण फी चे काय आहे.

मार्केट वि. प्रमुख श्री.भोसले :- गाळे धारकांनी प्रकरण सबमीट केले नाही. काही गाळे धारक कोर्टात गेले आहेत.रेडीरेकनर चे दर गाळेधारकांना मान्य नाही. नगररचना विभागामार्फत सर्व शॉपिंग सेंटरचा सर्व्हे करण्यात येवून भाडे आकारणी बाबत निर्णय होईल.

मा.सभापती साहेब :- नोटीस फि/ शास्ती या लेखाशिर्षा अंतर्गत ४ क्कोटी ३९लाख६० हजार वाढ करण्यात यावी.गाळे हस्तांतर फी मध्ये १० लाखांची वाढ सुचविण्यात येत आहे.या करीता गाळेधारक व प्रशासनाने समन्वय साधून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.आयुक्त साहेब :- धोंगडे रजेवर गेले होते ते आल्यानंतर हा प्रश्न मार्गी लावू

मा.सभापती साहेब :- गाळ धारक व प्रशासनाने योग्य तो समन्वय साधून त्यात वाढ करावी.

मा.श्री. संजय शेंडगे :- शास्ती माफी बाबत निर्णय घ्या.

मा.आयुक्त साहेब :- शास्ती माफी दरवर्षी एप्रिल व जून मध्ये यापूर्वी दिलेली आहे. चालू वर्षी शास्ती माफ करण्याची तयारी चालू असतांना दरम्यानच्या काळात पोटनिवडणूक लागल्याने निवडणूक आयोगाची परवानगी घेवून निर्णय घ्यावा लागेल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- लोकांना अपेक्षीत आहे शास्ती माफी होईल.

मा.आयुक्त साहेब :- आपण तात्काळ राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवून अभिप्राय घेवू.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- तात्काळ आदेश करून कोणाला तरी अर्जंट या कामा करीता पाठवा.

मा.आयुक्त साहेब :- आपण सांगीतल्या प्रमाणे कर्मचारी नियुक्त करुन तेथे बसून अभिप्राय घेण्यात येईल.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-अनधिकृत बांधकाम नियमानुसार करणे रूपये ४ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

मा.सभापती साहेब :- अनधिकृत बांधकाम नियमानुसार करणे या लेखाशिर्षा अंतर्गत ५० लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मालमत्ता नाव नोंदणी फी ३ कोटी ५० लाखाची तरतुद करण्यात आली आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- नविन घरांना घरपट्टी लागू करणे बाबत पाठपुरवा करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मालमत्ता धारकांच्या मालमत्तेची महानगरपालिकेकडे नोंद नाही.अशा मालमत्तेची नव्याने वाढ होवून मालमत्ता नोंदणी फी मध्ये ५० लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- महानगरपालिका शाळा भाडे उत्पन्न रू.५१ लाख ५० हजार

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- कोणती शाळा भाडयाने दिली.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या शाळा किती.

मनपा शिक्षण मंडळ श्री.वीर :- सद्यस्थितीत १२ शाळा चालू आहे. भाडे वसुली मार्केट विभागाकडे आहे.

मा.आयुक्त साहेब :-प्रशासनाधिकारी मंत्रालयात आता थकीत प्रश्न उपस्थित झाल्याने त्या बाबत माहिती देण्यासाठी मुंबईला गेले आहेत.

मार्केट वि. प्रमुख श्री.भोसले :- शाळांवर कारवाई करण्यासाठी अडचणी येतात.नूतन प्राथमिक विद्यालय, प्रगत विद्यालय, मार्कंडेय विद्यालय, रचना माध्यमिक विद्यालय यांना खोल्या भाडयाने दिल्या आहेत. रोकडे यांना राहण्यासाठी खोली दिली.तत्कालीन सभापतींनी ३ शिपाई यांना राहण्यासाठी दिल्या होत्या त्यापैकी २ सेवानिवृत्त झाले. एक कार्यरत आहे.

उर्दूशाळेकडे मोठया प्रमाणात थकबाकी आहे.शाळा बंदपडतील या स्तव कोणतीही कारवाई केले जात नाही.

मा.श्री. संजय शेंडगे :- कारवाई करा.

मा.आयुक्त साहेब :- प्रशासनाशी बोलून भाडे देत नसतील तर कारवाई करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- तात्कालीन नगरपालिका असतांना शाळांकरीता भाडेतत्वावर वर्गखोल्या भाडयाने दिलेले आहे.त्यावेळचे भाडे व सदयस्थिती तील भाडे याचा विचार करता या लेखाशिर्षामध्ये रू. २० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मोबाईल प्रशासकीय शुल्क - रू. ८० लाख, पे ॲण्ड पार्क - १ लाख १२ हजार

मार्केट वि.प्रमुख श्री.भोसले :-आनंदऋषी हॉस्पीटल जवळ पे ॲण्ड पार्क अंतर्गत एक जागा दिली आहे.त्यापासून १ लाख ४ हजार चालू वर्षात वसूल झाले.

मा.सभापती साहेब :- मागील झालेल्या मा.महासभेमध्ये झालेल्या ठरावा नुसार शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्क करीता जागा निश्चिती झाली असून या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.तसेच मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.१० लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- गॅन्ट्रीज १ लाख ८० हजार दर्शाविण्या आले आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर हद्दीमध्ये गॅन्ट्रीज बसविण्या बाबत मोठया प्रमाणात तक्रारी आल्या आहेत.या बाबत काही सामाजीक संस्थांनी काम बंद केले आहे.ज्या ठिकाणी गॅन्ट्रीज बसविण्यात आल्या आहे त्या दर्जात्मक दृष्टीने धोकादायक असल्याचे त्यांचे मत आहे.या बाबतची वस्तुनिष्ठ पहाणी करण्यात यावी.जर काम निकृष्ठ दर्जाचे असल्यास निविदा रद्द करण्यात येवून नव्याने निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी.जाहिरातीच्या माध्यमातून रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळेल.गॅन्ट्रीज रॉयल्टी या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पानं नं.९ वरील अनुदाने व अंशदाने वाचन करण्यात आले.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- मुद्रांक शुल्क अनुदान म्हणजे काय ?

मुख्यलेखाधिकारी श्री. झिरपे : एलबीटी बंद झाली,थकबाकी राहीली.एलबीटी सुरु होण्यापूर्वी शासनाकडे १५ कोटी अनुदान मिळायचे,एलबीटी चालू झाल्यानंतर एलबीटी अधिकार हे सेप्रेट शुल्क आहे. सन २०१३-१४ पूर्वी ची थकबाकी आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- पाठपुरावा कोण करत. शासनाचे देणे असेल त्यातून वर्ग करा.

एल.बी.टी. प्रमुख श्री.दिनेश गांधी :- अकौंट विभागाकडेच या बाबतची माहिती आहे.

मा.आयुक्त साहेब :- कुठल्यातरी विभागाने पाठपुरावा करावा लागेल. एल.बी.टी.विभागाने जबाबदारी घ्यायला पाहीजे ती दिली जाईल.

एल.बी.टी. प्रमुख श्री.दिनेश गांधी :- पूर्वीपासून अकौंट विभागा मार्फत कार्यवाही चालू होती.

मुख्यलेखाधिकारी श्री. झिरपे :- आम्ही चर्चा करु, किती अकौंटच्या पोष्ट पाहिजे. बिगारी क्लार्कचे काम करतात. कॅशीयर आणि अकौंटंट नाही.

मा.आयुक्त साहेब :- सर्व खात्यात अशीच परिस्थीती आहे. स्टॅपिंग पॅटर्न प्रमाणे पोस्ट भरल्या नाही. वरिष्ठ पद रिक्त आहे वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करतो आहोत. आस्थापना खर्च कमी करणे बाबत शासनाच्या सूचना आहेत हा गॅप जोपर्यंत कमी होत नाही तो पर्यंत शासन मंजूरी देत नाही. महसूल

उत्पन्नाच्या अगेंस्ट होणारा खर्च यातुन आस्थापना खर्चाची टक्केवारी काढली जाते. प्रत्येक विभागाने उत्पन्न वाढविले पाहिजे व खर्च कमी केला पाहीजे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- बांधकामचे किंगर आहे का ?

शाखा अभियंता श्री.सोनटक्के :- माहिती आली. एकुण ५३ कामगार, ३ मुकादम, ३ सुतार, ४ गवंडी, प्रत्यक्ष काम४-६ मा.पदाधिकारी वॉचमन यासाठी ३० लोक ओव्हरसियर साठी ४ लोक, मनपा प्रॉपर्टीवर वॉचमन

शाखा अभियंता श्री.सोनटक्के :- ३ सुतार आहेत. अतिक्रमणला वगैरे लागले तर देतो. मनपा प्रॉपर्टी मनपा अधिकारी, पदाधिकारी, जिल्हाधिकारी, मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त, यांचेकडे १ कर्मचारी महापौर मॅडम कडे १ आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- कलेक्टर कचेरीमध्ये द्यायचे काय कारण.

शाख अभियंता श्री.सोनटक्के :- पूर्वी पासून दिलेले आहेत, महावीर कलादालन येथे २ आहेत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- अनावश्यक दिलेले कर्मचारी काढा.

मा.सभापती साहेब :- पुढचा लेखाशिर्षण घ्या - पान नंबर १०

जीएसटी अनुदान

पान नंबर ११ रस्ते फोडणे जोडणे रू.१ कोटी ५० लाख

जुने निरुपयोगी साहित्य विक्री रू.१० लाख

स्टोअर विभाग प्रमुख श्री.जाधव :- स्टोअर विभागा मार्फत विक्री केली जाते. हे निविदा मागवून मागच्या वर्षी ७ लाख वसुल झाले एका गटामध्ये ४ व एका गटामध्ये ३ निविदा आल्या होत्या. संबंधित विभागाच्या मागणी नुसार कार्यवाही केली जाते.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सध्या जर भंगार शिल्लक असेल तर लगेच प्रोसेस करा.

मा.सभापती साहेब :- प्रसिध्दी विभागाचे कोण आहे.आपले हे वृत्तपत्र येतात त्याचे लिलावाची प्रक्रीया काय आहे.

प्रसिध्दी विभाग प्रमुख श्री.वैद्य :- रद्दी साठवली जाते. वृत्तपत्राच्या व्हॅल्यू नुसार स्टोअर विभागाकडे जमा करतो. दर स्टोअर विभागामार्फत निश्चित करुन विल्हेवाट लावली जाते.आतापर्यंत ३ हजार ८०० रु. ची रद्दी विक्री केली आहे. स्टोअर विभागाने पुढील कार्यवाही केली आहे.

मा.सभापती साहेब :- वाचनालयाची रद्दी अद्याप जमा केली नाही.

प्रसिध्दी विभाग प्रमुख श्री.वैद्य :- महावीर कलादालन हे स्टोअर विभागाकडे रद्दी जमा करतात व त्याची विल्हेवाट लावली जाते.

स्टोअर विभाग :- कोटेशन मागवून विक्री केली जाते.

पान नंबर १२

घनकचरा संकलन वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडे पासून उत्पन्न - रू. ५० लाख

घनकचरा विभाग प्रमुख श्री.डॉ.पैठणकर :- खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक निविदा झाली आहे. ठेकेदाराला वाहने भाडयाने घ्यावयाची आहे. आर.टी.ओ. कडून भाडे ठरवून घेणार आहोत त्यासाठी तरतुद केली आहे.

मा.सभापती साहेब :- खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक निविदा झाली असल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्नामध्ये रू.२० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

वैद्यकिय आरोग्य आधिकारी श्री.डॉ.बोरगे :- महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व दवाखाने, प्रसुतिगृहे, हॉस्पीटल, नर्सिग होम्स,प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी काम करीत आहे.प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी वेळोवेळी महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळास प्रतिज्ञापत्रा व्दारे यंत्रणा तात्काळ बसविण्यात येईल असे कळविले आहे. मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनीस बायो मेडीकल वेस्टची विल्हेवाट करणेबाबत दि.२८/७/२००३ रोजी कार्यांरभ आदेश देण्यात आले असून १५ वर्षाचा करार करण्यात आला आहे. सदरची मुदत हि जुलै २०१८ मध्ये संपत आहे.

मा.सभापती साहेब :- निविदा प्रक्रीया व प्रशासकीय सोपस्कार करणे करीता बराच कालावधी लागतो.त्यामुळे तात्काळ निविदा प्रसिध्द करण्यात यावी.डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये वाढ होणार असल्याने रू.८ लाखांनी वाढ करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अति चटई क्षेत्र निर्देशांक प्रिमीयम - रू. २ कोटी

मा.श्री.संजय शेंडगे :- मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखांनी वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नंबर ३७ सर्व जमा बाजू घेवू

जलनिस्सारण विभाग अ.क्र.१ ते ५ चे वाचन करण्यात आले.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- नळा धारकांकडून रू. २ कोटी ५० लाख

मा.सभापती साहेब :- एकुण नळ कनेक्शन किती आहेत.

रिव्हीजन विभाग श्री.झिने :- मालमत्ता १ लाख ८हजार आहेत.नळ कनेक्शन धारकांची संख्या ५३,००० हजार आहे. ओपन प्लॉट २८,००० आहेत. १४,००० प्रॉपर्टी कमर्शिअल आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर हद्दीमध्ये १ लाख १५ हजार मिळकत धारकांच्या नोंदी असून फक्त ५३ हजार अधिकृत नळ कनेक्शन आहेत.अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी.अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे लेखाशिर्षांतर्गत रू. १ कोटीची वाढ करण्यात यावी.नळधारकाकडून जमा पाणीपट्टी रू.२ कोटीची वाढ करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.३७ अ.क्र.४ पाणी विक्री जमा तरतुद १ कोटी २५ लाख.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख रूपयांची वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटी ७५ लाख दर्शविण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- खर्च बाजूचे वाचन करतो.

मा.सभापती साहेब :-जमेची सर्व बाजुंचे वाचन पुर्ण झाले आहे.सभा १५मिनीट करीता तहकूब करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सभा सुरू करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.१४ महसूली खर्च वाचन केले.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- या मधील सामाजीक संस्थांना देणगी या लेखाशिर्षावरील रू.६ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. शहरामध्ये विविध सामाजिक संस्था सामाजिक शैक्षणिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करतात याकामी येणारा खर्च संस्थांना परवडणारा नसतो शहराचा नाव लैकीक वाढीसाठी या संस्था कायम प्रयत्न करतात.या मध्ये वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- रू. २ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.१५ ते १७ वाचन केले.पान नं.१८ वरील सिटी सर्व्हे सावेडी गांवठाण रूपये ३० लाखाची तरतुद करण्यात आली आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- या पुर्वी त्यांना या कामापोटी महानगरपालिकेने चेक दिला होता परंतु काम केले नाही.या बाबत माहिती सांगा.

नगररचनाकार विभाग श्री.जोशी :- सावेडी गांवठाणाची सुरूवात दिल्लीगेट पासुन ते इंद्रयणी हॉटेल पर्यत जाते.या सर्व जागेंचा सर्व्हे करावायाचा झाल्यास १ कोटी पेक्षा जास्त रकमेची मागणी केली आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- फक्त सावेडी गांवापुरतेच काम करण्यात यावे.

मा.आयुक्त साहेब :- नगररचनाकार धोंगडे हे कामावर हजर झाल्यानंतर या बाबत सिटी सर्व्हे अधिका-यां समवेत बैठक घेवून त्यावर निर्णय घेण्यात येईल.

मा.श्री.संजय शेंडगे :- मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी महानगरपालिकेस खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु. २ लाख तरतुद ठेवण्यांत यावी.

पान नं.२० वैदयकीय खर्चाची परीपुर्ती विमा हप्ता १ कोटी तरतुद करण्यात आली आहे.

पान नं. ५४ क भांडवली जलनिःसारण पान नं.

अमृत योजना - शहर भुयारी गटर अनुदान रूपये २५ कोटी

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- रूपये २५ कोटी कसे धरले

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री. काकडे :- एक वर्षासाठी तरतुद केली आहे.अमृत योजना शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा / कर्ज रू. १७ कोटी

श्री. काकडे :- रूपये २५ ऐवजी ५० कोटी धरले तरी चालेल

पान नं.५४

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- प्रकल्प अहवाल तयार करणे कामी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती शासन अनुदान रू.२५ लाख,केडगाव पाणी पुरवठा योजनेतुन स्तलांतरीत नळ जोडणी पासुन उत्पन्न रू. ७५ लाख, महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर )राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजय नगर व नालेगांव पाणी पुरवठा योजना रू.६५ लाख,म.सु.ज.यो.सन २००९-१० निर्मल व सुजल अभियान अनुदान/पाणी पुरवठा विषयक सुधारणात्म उपाययोजना ४५ लाख, शहर पाणी पुरवठा योजना फेज- २ ननळ कनेक्शन नविन लाईनवर स्तलांतरीत करणे उत्पन्न २ कोटी,नागरी दलीत वस्ती पाणी पुरवठा सुधारणा रू. ५० लाख

असे एकूण पाणी पुरवठा योजना रू. ४ कोटी ६०लाख भांडावली जमा ४६ कोटी ६१ लाख भांडवली जमा बाजू संपली आहे.

मा.सभापती साहेब :- अधिका-यांनी वसुलीची काळाजी घ्या १५ मि. साठी सभा तहकुब करण्यात येत आहे.

आता महसुली खर्च व भांडवली खर्च घेवू पान नं.१४

मा.सभापती साहेब :- विषय वाचा

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- लेखाशिर्ष सामान्य प्रशासन अणि वसुलीचा खर्च, अ.नं.९ निवडणुक खर्च रू.१ ोटी ८० लाख धरला आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- निवडणूक खर्च मध्ये केलेली तरतुद कमी करा.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- पुढचे वर्ष निवडणूकीचे वर्ष आहे प्रिटींग,ई.व्हि.एम. मशीन कर्मचा-यांचे, मानधन इ. साठी खर्च करावा लागणार आहे.

मा.प्र.उपायुक्त श्री. तडवी :- मागील वर्षी रू.१ कोटी २५ लाख निवडणूक खर्च धरला होता.

मा.सभापती साहेब :- निवडूक खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१० लाखांनी कपात करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे:-गणवेश खरेदी३५लाख,पान नं.१४,नविन संगणक,संगणक साहित्य, हार्डवेअर, सॉप्टवेअर,खरेदी (सर्व विभाग)/ ई.गर्व्हनर्स रू.२५ लाख ,संगणक दुरूस्ती(सर्व विभाग ) रू.७ लाख

मा.सभापती साहेब :- नविन संगणक,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॉप्टवेअर,खरेदी (सर्व विभाग)/ ई.गर्व्हनर्स रू.२५ लाख ऐवजी रक्कम रूपये २० लाख दर्शविण्यात यावी.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- मध्यंतरी लीज लाईन बंद होती.

संगणक विभाग श्री. साळी :- हेड आउटर टाकले लीज लाईन साठी सेप्रेट कनेक्शन घेतले.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- आस्थापना खर्च ७० टक्के सांगता.आस्थापना खर्चाची टक्केवारी प्रत्यक्ष धरली पाहिजे कि अप्रत्यक्षवर धरला पाहिजे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- प्रत्यक्षवर धरला पाहिजे.

मा.श्री. बाबासाहेब वाळके :- अपेक्षीत वर धरला पाहिजे ते लेखी दया, अपेक्षीत वर धरले तर ५०% वर खर्च येतो.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अभ्यास करून दोन दिवसात देतो.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- चार्ट तुमच्या कडे देतो, प्रत्यक्ष उत्पन्न व प्रत्यक्ष खर्चावर आस्थापना खर्च तयार होतो.

मा.श्री. बाबासाहेब वाळके :- लेखी दया

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- अ.नं. २८ जी.आय.एस. सिस्टम ३० लाख,नगरसचिव विभाग,आकस्मिक खर्च,रू. ३ लाख,मा.महासभा, स्थायी समिती इतर प्रभाग समिती अतिथी चहापान खर्च रू.४ लाख ,मिटींग भत्ता रू. ५ लाख,मा. महापौर अतिथी भत्ता रू.९० हजार ,मा. सभासद मानधन रू. ९० लाख ,महापौर वैद्यकीय सहाय्यता निधी रू.१५लाख,महापौर आपत्कालीन सहाय्यता निधी रू.२ लाख ,पोलिस बंदोबस्त (सभा व इतर) रू. २ लाख,स्व. सदाशिव अमरापुरकर (अभिनेता) व स्व. अनिल क्षीरसागर (बालीकाका) व इतर कलावंत पुरस्कार रू.३ लाख,महापुरूषांची जयंती / पुण्यतिथी खर्च रू.१ लाख ,मान्यवरांना मानपत्र प्रदान करणे रू. १५हजार

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.१७ वसुली विभाग,सन २०१८-१९ च्या मालमत्ता कराची बीले १ लाख ४० हजार बीले आहेत. पुर्नमुल्यांकन खर्चासाठी ५ लाख तरतुद पाहिजे.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- रेकॉर्ड विभागात वसुली छपाई रू. ३ लाख दर्शविली आहे

रिव्हिजन विभाग श्री. झिने :- आमच्यातुन पाहिजे.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- रितसर खर्च न करता,आकस्मिक खर्चातून तरतुद कशाला करायची.

रिव्हीजन विभाग श्री. झीनेः- बीले जी झेरॉक्स प्रिंट करतो ४-५ वर्षापासून खर्च चालू आहे. टाचण रजि.छपाई साठी रू. ३ लाख खर्च येईल.आम्ही सर्व प्रोसेस करतो. बीलाला जर उशीर झाला तर आम्ही जबाबदार राहणार नाही.

मा.सभापती साहेब :- ब.मालमत्ता कर वसुली विभाग मधील अ.क्र.४ आकस्मिक खर्च या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ३लाखाने वाढ करून रक्कम रूपये ५ लाख २५ हजार दर्शविण्यात यावी.

संगणक विभाग श्री.साळी :- त्यांचा विषय रास्त आहे.संगणक विभागासाठी रू.२५ लाख तरतुद ठेवली आहे, त्यामध्ये वाढ करून रू.३० लाख तरतुद करा.

मा.श्री. बाबासाहेब वाळके :- सगळयाची जर मागणी असेल तर तसे करा.

रिव्हीजन विभाग श्री. झिने :- कॉम्प्युटर बीले पेनड्राईव्हमध्ये फिड करून त्याच्या झेरॉक्स काढतो.

श्री. सय्यद हाफीन :- २ वर्ष झाले आमच्याकडे येत नाही, त्यामुळे आम्हाला काहीच माहिती नाही.

मा.सभापती साहेब :- मालमत्ता कर वसुली विभाग मधील अ.नं. ३ मालमत्ता पुर्नमुल्याकंन खर्च यामध्ये रूपये ५ लाख तरतुद करावी.

मा.सभापती साहेब :- सभापती स्थायी समितीला प्रोसीडींग बुक उपलब्ध नाही.

श्री. सय्यद हाफीन :- गेल्या १ ते दीड वर्षापासून टेंडर मंजुर नाही. मी आल्यापासून रू.१९ लाख खर्च झाला आहे.यापुर्वी रू. ३० लाख खर्च येत होता.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.१८अ.क्र.३.आर्किटेक्चर कन्सलटंट फी रू. १ लाख,सिटी सर्व्हे सावेडी गावठाण रू. ३० लाख

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- सावेडी गांवठाण सिटी सर्व्हे साठी तरतुद किती दिवसापासून ठेवता काय केले.

मा.सभापती साहेब :- सावेडी गांवठाण सिटी सर्व्हे साठी तरतुद रू.१० लाखांची वाढ सुचविण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- नगररचना विभाग प्रशासकीय खर्च रू. ७ लाख ,आकस्मिक खर्च रू.२.५ लाख,वसुली परतावा (मालमत्ता कर , पाणीपटटी इ.) रू. ५ लाख,जकात कर परतावा रू. १ लाख, स्थानिक संस्था कर परतावा रू.७० लाख,इतर परतावा रू.५ लाख.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- आस्थापना विभाग पान नं.१९आयुक्त व आयुक्त व प्रमुख कार्यालय वेतन रू. २ कोटी ८० लाख ,अभिलेख कक्ष वेतन रू. २० लाख,भांडार विभाग वेतन रू.४३ लाख,आस्थापना विभाग व मागासवर्ग कक्ष वेतन रू.९० लाख,विधी विभाग वेतनरू.१५ लाख,कामगार विभाग वेतन रू.१५लाख,महिला व बालकल्याण व सुवर्ण जयंती विभाग वेतन रू.१२ लाख,नगरसचिव विभाग वेतन रू.१ कोटी ६० लाख ,संगणक विभाग वेतन,रू. ४० लाख,माहिती व जनसंपर्क विभाग वेतन रू.२२ लाख,ग्रंथपाल यांचे पथक वेतन रू.२५ लाख,एल.बी.टी. विभाग वेतन रू. १ कोटी ९० लाख,माहिती व सुविधा केंद्र वेतन रू.५० लाख,प्रभाग समिती कार्यालये (४प्रभाग) वेतन रू. ३ कोटी,मुल्यनिर्धारण व करसंकलन विभाग वेतन४.५० कोटी,मुख्य लेखा व वित्ता विभाग वेतन १.१० कोटी.

मा.सभापती साहेब :- अ.क्र.४१ वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती / मेडिक्लेम विमा हप्ता खुलासा करा.

आस्थापना विभाग श्री.दिकोंडा :- कर्मचारी किंवा कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यास यातुन खर्च करण्यात येतो.प्रत्येक वर्षाला ३० ते ४० प्रकरण येतात.

मा.सभापती साहेब :- स्टार हेल्थ सारख्या सुविधा दिल्या तर किती खर्च येवू शकेल.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- स्टार हेल्थ योजने अंतर्गत वर्षाचा खर्च रू. १.२५ कोटी येतो व वैदयकीय प्रतीपुर्ती करीता रू. ६० लाख खर्च येतो.

अग्निशनम विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- अग्निशमन सल्लागार अनुदान प्रत्येक महानगरपालिकेस फिक्स केले आहे. अग्नीशमन सेवेत असताना मृत्यु झाल्यास त्याला यातून मदत दिली जाणार आहे.दरवर्षी जमा करणे आवश्यक आहे.परंतु ६-७ वर्षापासून थकबाकी आहे.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- ११ वर्ष दिले नाही. मग आतच दयायची काय आहे.थोडे दया,तरतुद कमी करा.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन सल्लागार अनुदान या लेखाशिर्षा मध्ये रू.६ लाखांनी कमी करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- नवीन वाहन खरेदी रूपये ५० लाख या बाबत खुलासा करावा.

अग्निशनम विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- यावर्षी किमान १ वाहन खरेदी करावे लागेल, रू.५० लाख तरतुद कमी आहे. तरतुद रू. ८० लाख करावी. किमान १ छोटे व १ मोठे वाहन येईल.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाकडून या करीता निधीची मागणी येवून या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाखांनी कमी करण्यात यावी.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- डी.पी.डी.सी.कडे या बाबत मागणी केली आहे.पण पैसे मिळत नाही. शासन तेव्हढी रक्कम देत नाही.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- या करीता तरतुद रूपये ५० लाख ठेवा.

मा.सभापती साहेब :- विशेष निधी मधून वाहने खरेदी करावी व या लेखाशिर्षात रूपये ५० लाख तरतुद ठेवावी सभापती अग्निशमन सल्लागार अनुदान रू.११ लाख ऐवजी ५ लाख करण्यात येत आहे.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान सहभाग मनपा हिस्सा रूपये ३६.५० लाख, मा. शासनाकडून नवीन अग्नीशमन केंद्र बांधण्याकरीता अनुदान मिळणार आहे त्यासाठी मनपा हिस्सा ५०% ठेवला आहे.

मा.श्री. संजय शेंडगे :- पिंपळगाव येथे मनपाचा एक कर्मचारी याने झाडे तोडली व परस्पर विकली.

श्री. काकडे :- आज पहाणी साठी जाणार होतो सभेसाठी उपस्थित रहाणे आवश्यक असल्याने उदया जातो.

मा.आयुक्त साहेब :- या प्रकरणाची चौकशी करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- कार्यालयीन खर्च बाहययंत्रणा रूपये १० लाख

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- अग्निशमन विभागाकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे मानधनावरील कर्मचारी भरती करण्याची मागणी होते. त्यासाठी तरतुद केली आहे.राज्यअग्नीशमन केंद्रामधील प्रशिक्षण पूर्ण केलेला कर्मचारी नेमता येईल.आकृतीबंधानुसार कर्मचारी भरती साठी सेवा शर्ती व शैक्षणीक पत्रका ठरविण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्यांनी विधी व न्याय विभागाकडे अभिप्राय मागीतला आहे.या बाबत मा. शासनाकडून मार्गदर्शन मागवू.

मा. सभापती साहेब :- फायरमन यापदावर ठेका पध्दतीने न नेमता मानधनावर नेमणूक करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मोकाट कुत्रे बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे रू. ५० लाख

मा.सभापती साहेब :- तुमची बिनपगारी करण्यात येत आहे. इथुन पुढे असे वागुणका म्हसे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.डॉ. बोरगे :- मा. सुप्रीम कोर्टाचे आदेश आले आहे.ॲनिमल वेलफेअर बोर्डचे सर्टीफिकेट असणा-या कडून काम करून घेण्याबाबत बंधनकारक आहे.कुत्र्ये पकडणे,नसबंदी करणे,लस टोचणी,कुत्र्यासाठी ४ दिवस अन्न पुरविणे या सर्व गोष्टींसाठी टेंडर प्रसिध्द केले आहे.१ वर्षा साठी साधारण ५० लाख खर्च येईल.चार वेळा टेंडर प्रसिध्द केले परंतु आत्तापर्यत एकही संस्था आली नाही.आगामी ८ ते १५ दिवसांमध्ये येवू शकते.सध्या महानगरपालिकेमार्फत हे काम चालू आहे.शहरात ७ ते ८ हजार कुत्र्ये आहेत.या करीता व्हेर्टनरी डॉक्टर लागतील.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- तुम्ही थोडे गांर्भीर्याने घ्या.

मा.सभापती साहेब :- मोकाट कुत्रे बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ३० लाख ठेवण्यात यावी.

पुढचा विषय घ्या.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- श्वानदंशावर लस खरेदी रू.१० लाख

मा.श्री.संजय शेंडगे :- सिव्हिल हॉस्पीटल मार्फतच लस उपलब्ध होते हे माहिती आहे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.डॉ. बोरगे :- तोफखाना दवाखान्यात गेल्या ३ ते ४ वर्षा पासुन लस उपलब्ध आहे.परंतु सदर लस पुरवठा करणा-या ठेकेदाराचे देयक अदा न केल्याने त्याने पुरवठा बंद केला आहे.त्याचे देयक अदा करावे लागेल.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- मोकाट जनावरे रू.१५ लाख.

मा.सभापती साहेब :- मोकाट जनावरे बंदोबस्त या लेखाशिर्षा अंतर्गत रू.७ लाख ठेवण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पान नं.२३ रस्ते व इमारती वरील दिवाबत्ती

विदयुत साहित्य खरेदी रू.७० लाख,रस्ते व इमाती वरील बील रू.६.५० कोटी,

विद्युत विभाग श्री. क्षेत्रे :- विदयुत साहित्य मागच्या वर्षी रू.७०.५२ लाख खर्च झाला.

मा.श्री. बाबासाहेब वाकळे :- या मधील तरतुद रूपये ५० लाख खर्च करा.

मा.सभापती साहेब :-चर्चेनुसार विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२० लाख तरतुद कमी करण्यात यावी.

मा.श्री. संजय शेंडगे :- टायमर बसविले का नाही?

विद्युत विभाग श्री. क्षेत्रे :- जास्त लोड असल्याने टायमर टिकत नाही.

मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे,उर्जाबचत दिवे बसविणे रू.१ लाख,नविन इले.पोल,स्टीट लाईट स्पॅन फिटींग रू.७ लाख,जुने इले. पोल हलविणे रू. १० लाख,नविन मिटर कोटेशन खर्च १ लाख,विद्युत बचत प्रकल्प राबविणे रू.१ हजार,वायरमन मानधन रू.१० लाख.

मा.सभापती साहेब :- जुने पोल हलविणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ३ लाख तरतुद ठेवण्यात यावी.तसेच नवीन इले. पोल, स्ट्रीट लाईट पॅन फिटींग या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१ लाख तरतुद ठेवण्यात येत आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- विद्युत विभागात किती वायरमन आहेत या बाबत माहिती दया.

विद्युत विभाग श्री. क्षेत्रे :- मानधनावर १२ वायरमन आहेत.महानगरपालिकेचे ९ वायरमन आहेत त्या पैकी ६ बिगारी लाईन चालू, बंद करण्यासाठी आहेत.सर्व वायरमन ला १ बिगारी मदतनीस दिला आहे.

मा.सभापती साहेब :- चर्चुनसार आहे ती तरतुद ठेवावी.

सोलर पथदिवे दुरूस्ती २ लाख

विद्युत विभाग श्री. क्षेत्रे :- मागच्या वर्षीत यावर खर्च झालेला नाही.

मा.सभापती साहेब :- सोलार पथदिवे दुरूस्ती रू. १ लाखाची तरतुद करण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी :- कार्यालयीन खर्च (बाहययंत्रणा) रू.१० लाख,वाहतुक नियंत्रक देखभाल रूपये १० लाख.

